**१९९६ पूर्वीच्या निवृत्तिवेतनधारकांच्या/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन निर्णय; क्रमांक : सेनिवे १०००/९५/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ सप्टेंबर २०००.

**पहा**––(१) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक सेनिवे. १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे. १०९९/३०४/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९.

# निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे. १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अन्वये १९९६ पूर्वीच्या निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या प्रकरणी कुटुंब निवृत्तिवेतनाचे एकत्रिकरण/सुधारणा करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद ४, ५ व ७ मध्ये कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा करण्याबाबतच्या तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत. आता, मृत शासकीय कर्मचारी/निवृत्तिवेतनधारकाच्या कुटुंबातील पात्र सदस्यास विद्यमान नियमानुसार विनिर्दिष्ट कालावधीसाठी अनुज्ञेय ठरणाऱ्या वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाचे एकत्रिकरण/सुधारणा करण्यासंबंधात स्पष्टीकरणे देण्याबाबतची मागणी या विभागाकडे करण्यात येत आहे. शासन या संदर्भात खालीलप्रमाणे खुलासा करीत आहे :—

(अ) **जे शासकीय कर्मचारी/निवृत्तिवेतनधारक १ जानेवारी १९८९ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झाले आहेत/मृत्यू पावले आहेत आणि ज्यांचे शेवटचे वेतन दरमहा रु. १,५०० पेक्षा अधिक होते आणि ज्यांच्या प्रकरणी १ जानेवारी १९९६ रोजी किंवा त्यानंतर वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होते, अशा प्रकरणी वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा––**

वरील प्रकरणी वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनात १ जानेवारी १९९६ पासून खालील पद्धतीने सुधारणा करण्यात येईल––

(१) विद्यमान वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे. १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ च्या परिच्छेद क्रमांक ४ मधील तरतुदींनुसार (म्हणजेच शीघ्रगणकानुसार) १ जानेवारी १९९६ पासून एकत्रित करण्यात येईल. **कोणत्याही प्रकरणी, वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन हे, एकत्रित/सुधारित सर्वसाधारण दराच्या कुटुंब निवृत्तिवेतनाच्या दुप्पट दराने अनुज्ञेय असणार नाही.**

(२) निवृत्तिवेतनधारक/मृत कर्मचाऱ्याने घेतलेल्या शेवटच्या वेतनाच्या ३० टक्के या दराने सर्वसाधारण कुटुंब निवृत्तिवेतनाची पुनर्गणना करण्यात येईल आणि त्यानंतर त्या आधारावर वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाची पुनर्गणना खालील पद्धतीनुसार करण्यात येईल :––

(ए) जेथे शासकीय कर्मचारी सात वर्षांहून कमी नाही इतकी सतत सेवा केल्यानंतर **सेवेत असताना मृत्यू पावला असेल** तेथे त्याच्या कुटुंबास देय ठरणाऱ्या वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाचा दर त्याने घेतलेल्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतका असेल.

(बी) शासकीय कर्मचाऱ्याचा **सेवानिवृत्तिनंतर मृत्यू झाल्यास** वरील (अ) प्रमाणे निर्धारित केलेले वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन, शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर प्राधिकृत केलेल्या निवृत्तिवेतनाइतके मर्यादित/निर्बंधित करण्यात येईल.

(३) वाढीव अतिरिक्त कुटुंब निवृत्तिवेतन म्हणजेच टप्पा पद्धतीनुसार यापूर्वीच अनुज्ञेय ठरलेले वाढीव अतिरिक्त कुटुंब निवृत्तिवेतन आणि वरील (२) प्रमाणे परिगणित करण्यात आलेले वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन, यामधील फरक परिगणित करण्यात येईल.

(४) वरील (३) प्रमाणे परिगणित करण्यात आलेले वाढीव अतिरिक्त कुटुंब निवृत्तिवेतन, वरील (१) प्रमाणे परिगणित करण्यात आलेल्या एकत्रित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनात मिळविण्यात येईल. एकत्रित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन अधिक वाढीव अतिरिक्त कुटुंब निवृत्तिवेतन यांची एकूण बेरीज म्हणजे १ जानेवारी १९९६ पासून अनुज्ञेय ठरणारे '' **एकूण वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन** '' असेल आणि ते विनिर्दिष्ट कालावधीसाठी असेल व त्यास विहित मर्यादा लागू राहतील.

(५) **जेथे शासकीय कर्मचारी सेवेत असताना मृत्यू पावला असेल** आणि जेथे वरील (४) प्रमाणे परिगणित करण्यात आलेली एकूण वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम, मृत शासकीय कर्मचाऱ्यांने त्याच्या मृत्यूच्यावेळी शेवटी धारण केलेल्या पदाला १ जानेवारी १९९६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या किमान वेतनाच्या ५० टक्क्यांहून कमी असेल तेथे एकूण वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम सुधारित वेतनश्रेणीच्या किमान वेतनाच्या ५० टक्क्यापर्यंत वाढविण्यात यावी.

(६) **जेथे सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी म्हणजे निवृत्तिवेतनधारक १ जानेवारी १९९६ पूर्वी मृत्यू पावला असेल** व जेथे वरील (४) प्रमाणे परिगणित करण्यात आलेले सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन (म्हणजे एकूण वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन), निवृत्तिवेतनधारकाने त्याच्या निवृत्तिच्यावेळी शेवटी धारण केलेल्या पदाला १ जानेवारी १९९६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या किमान ५० टक्के रक्कम किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या १ जानेवारी १९९६ रोजी काल्पनिकरित्या सुधारण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम, यापैकी जी कमी असेल, एवढे असेल. अशा प्रकरणी संबंधित निवृत्तिवेतनाविषयक नियम आणि वर नमूद केलेला शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ यांच्या तरतुदी व मृत निवृत्तिवेतनधारकाचे वेतन आणि अर्हताकारी सेवा विचारात घेतल्या जातील व त्याच्या निवृत्तिवेतनात १ जानेवारी १९९६ रोजी काल्पनिकरित्या सुधारणा करून सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनावरील मर्यादा परिगणित करण्यात येईल. सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन १ जानेवारी १९९६ रोजीच्या काल्पनिक सुधारित निवृत्तिवेतनाएवढे मर्यादित करण्यात येईल. **कोणत्याही प्रकरणी सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन म्हणजेच एकूण वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन, एकत्रित/सुधारित सर्वसाधारण दराच्या कुटुंब निवृत्तिवेतनाच्या दुप्पट दराने अनुज्ञेय असणार नाही.**

(७) दरमहा रु. १,२७५ ची किमान मर्यादा वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनावर सुद्धा स्वतंत्रपणे लागू राहील.

(८) ज्या प्रकरणी निवृत्तिवेतनधारक हयात आहेत किंवा १ जानेवारी १९९६ रोजी हयात होते, त्यामुळे कुटुंब निवृत्तिवेतन सुरू झालेले नाही, अशा विद्यमान निवृत्तिवेतनधारकाचे, जेथे लागू असेल तेथे, वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन आणि सर्वसाधारण दराचे कुटुंब निवृत्तिवेतन देखील या आदेशानुसार अद्ययावत आणि एकत्रित करण्यात येईल. अशा प्रकरणी कुटुंब निवृत्तिवेतन देय होताच कुटुंब निवृत्तिवेतनाचे अद्ययावत दर लागू होतील.

(९) ज्या दिनांकापासून वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहणार नाही, त्या दिनांकापासून अद्ययावत सर्वसाधारण दराने कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहील.

**(ब) वरील '' अ '' येथे नमूद केलेल्या प्रकरणाव्यतिरिक्त अन्य प्रकरणी म्हणजे जेथे शासकीय कर्मचारी/निवृत्तिवेतनधारकाचे शेवटचे वेतन दरमहा रु. १,५०० पेक्षा कमी होते, अशा प्रकरणी वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा––**

वरील प्रकरणी वर नमूद केलेला शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ मधील तरतुदीनुसार सर्वसाधारण/वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय असेल आणि त्यानुसार त्यांचे सर्वसाधारण/वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन

अद्ययावत करण्यासाठी त्यास जोडलेल्या शीघ्रगणकाचा उपयोग करण्यात येईल. अशा प्रकरणी खालील तरतुदी देखील विचारात घेण्यात येतील--

(ए) **जेथे शासकीय कर्मचारी सेवेत असताना मृत्यू पावला असेल** आणि जेथे वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम, मृत शासकीय कर्मचाऱ्यांने त्याच्या मृत्यूच्यावेळी शेवटी धारण केलेल्या पदाला १ जानेवारी १९९६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या किमान वेतनाच्या ५० टक्क्यांहून कमी असेल तेथे वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम सुधारित वेतनश्रेणीच्या किमान वेतनाच्या ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात यावी.

(बी) **जेथे सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी म्हणजे निवृत्तिवेतनधारक १ जानेवारी १९९६ पूर्वी मृत्यू पावला असेल** व जेथे सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन, निवृत्तिवेतनधारकाने त्याच्या निवृत्तिच्यावेळी शेवटी धारण केलेल्या पदाला १ जानेवारी १९९६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या किमान ५० टक्के रक्कम किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या १ जानेवारी १९९६ रोजी काल्पनिकरित्या सुधारण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम, यापैकी जी कमी असेल, एवढे असेल. अशा प्रकरणी संबंधित निवृत्तिवेतनविषयक नियम आणि वर नमूद केलेला शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ यांच्या तरतुदी व मृत निवृत्तिवेतनधारकाचे वेतन आणि अर्हताकारी सेवा विचारात घेतल्या जातील व त्याच्या निवृत्तिवेतनात १ जानेवारी १९९६ रोजी काल्पनिकरित्या सुधारणा करून सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनावरील मर्यादा परिगणित करण्यात येईल. सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन १ जानेवारी १९९६ रोजीच्या काल्पनिक सुधारित निवृत्तिवेतनाएवढे मर्यादित करण्यात येईल. **कोणत्याही प्रकरणी सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन, एकत्रित/सुधारित सर्वसाधारण दराच्या कुटुंब निवृत्तिवेतनाच्या दुप्पट दराने अनुज्ञेय असणार नाही.**

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे. १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ च्या तरतुदीनुसार कुटुंब निवृत्तिवेतनाचे तसेच त्यावरील महागाई वाढीचे एकत्रिकरण केल्यामुळे अंतरिम उपाय म्हणून यापूर्वीच प्रदान करण्यात आलेली थकबाकी निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकाऱ्यांकडून म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांच्याकडून या आदेशाच्या आधारे वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन तसेच त्यावरील महागाई वाढी यामध्ये सुधारणा केल्यामुळे देय ठरत असलेल्या थकबाकीशी समायोजित करण्यात येईल.

३. वरील तरतुदी जे शासकीय कर्मचारी/निवृत्तिवेतनधारक १ जानेवारी १९८९ पूर्वी सेवानिवृत्त झाले होते आणि ज्यांच्या प्रकरणी १ जानेवारी १९९६ रोजी किंवा त्यानंतर वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होते अशा प्रकरणी देखील लागू राहतील.

४. एकत्रित/सुधारित वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन परिगणित करण्यासंबंधातील काही उदाहरणे सोबतच्या **जोडपत्रात** देण्यात आली आहेत.

५. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे. वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले जोडपत्र हे इंग्रजी प्रतीसोबत जोडल्याप्रमाणे असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वसंत वा. चौधरी,**
शासनाचे उप सचिव,

प्रति,

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),

महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी-ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५२० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र. ३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्रशिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),

कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),

शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

वित्त विभागातील सर्व कार्यासने,

निवडक नस्ती, कार्यासन सेवा-४.

***पत्राद्वारे.**

**Revision of Enhanced Family Pension in case of pre-1996 pensioners/family pensioners.**

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**FINANCE DEPARTMENT**

Resolution No. PEN. 1000/95/SER-4,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 29th September 2000

*Read.*—(1) Government Resolution, Finance Department, No. PEN. -1099/303/SER-4, dated 15th November 1999.

(2) Government Resolution, Finance Department, No. PEN.-1099/304/SER-4, dated 15th November 1999.

*RESOLUTION*

By Government Resolution, Finance Department, No. PEN.-1099/303/SER-4, dated 15th November 1999, orders have been issued regarding consolidation/revision of family pension in the case of pre-1996 pensioners/family pensioners. In para 4, 5 and 7 of the said Government Resolution, the provisions regarding revision of family pension have been laid down. Clarifications are now being sought from this Department in regard to revision/consolidation of enhanced family pension admissible for a specified period as per extant rules to the eligible members of the family of a deceased Government servant/pensioner. Government is now pleased to clarify as follows :—

**(A) Revision of Enhanced Family Pension in those cases where a Government servant/pensioner was in receipt of last pay exceeding Rs. 1,500 p.m. and who had retired/died on or after 1st January 1989 and in respect of whom family pension at enhanced rate was admissible on or after 1st January 1996 :—**

In above cases enhanced family pension may be revised with effect from 1st January 1996 in the following manner :—

(*i*) The existing enhanced family pension shall be consolidated with effect from 1st January 1996 in accordance with the provisions contained in para 4 (*i.e.* as per the Ready Reckoner) of the Government Resolution, Finance Department, No. PEN.-1099/303/SER-4, dated 15th November 1999. **In no case enhanced family pension will be allowed at twice the consolidated/revised normal rate of family pension.**

(*ii*) Family pension at the normal rate shall be recalculated at the rate of 30 per cent of the last pay drawn by the pensioner/deceased employee and then on the basis of the same enhanced family pension shall be recalculated as per the following manner :—

(*a*) Where a Government servant, **died while in service** after having rendered not less than seven years continuous service, the rate of family pension payable to the family shall be equal to 50 percent of the pay last drawn.

(*b*) In the event of **death of a Government servant after retirement,** the family pension as determined under (*a*) above shall be restricted to the pension authorised on retirement from Government service.

(*iii*) The enhanced additional family pension *i.e.* the difference between the enhanced family pension already admissbile under slab system and the enhanced family pension as worked out at (*ii*) above, shall be worked out.

(*iv*) The enhanced additional family pension as worked out at (*iii*) above shall be added to the consolidated enhanced family pension worked out as at (*i*) above. The total of these two amounts *i.e.* the consolidated enhanced family pension plus enhanced additional family pension shall be the "**Total Enhanced Family Pension**" admissible with effect from 1st January 1996 for a specified period and shall be subject to prescribed limits.

(*v*) **Where a Government servant died while in service** and where the amount of total enhanced family pension worked out at (*iv*) above, is less than 50 per cent of the minimum of the revised scale of pay introduced with effect from 1st January 1996 for the post last held by the deceased Government servant at the time of his death, the total enhanced family pension shall be further stepped upto 50 per cent of the minimum of such revised scale of pay.

(*vi*) **Where a retired Government servant i.e. pensioner died prior to 1st January 1996,** the revised enhanced family pension (*i.e.* total enhanced family pension) worked out at (*iv*) above will be 50 per cent of the minimum of the revised pay scale of the post last held by the pensioner at the time of his retirement or notionally revised pension of the pensioner as on 1st January 1996, whichever is less. In such cases, the restriction on enhanced family pension will be worked out by revising the pension of the deceased pensioner notionally as on 1st January 1996 by taking into consideration the provisions of relevant Pension Rules and Government Resolution, Finance Department, dated 15th November 1999 mentioned above; and on the basis of his pay and qualifying service. The revised enhanced family pension will be restricted to the notional revised pension as on 1st January 1996. **In no case the total enhanced family pension will be allowed at twice the consolidated/ revised normal rate of family pension.**

(*vii*) The floor ceiling of Rs. 1,275 p.m. will also be applied separately for family pension at enhanced rate.

(*viii*) In the case of existing pensioners in whose cases the family pension has not come into operation as pensioners are/were alive on 1st January 1996, the rates of family pension at enhanced rate wherever applicable and at normal rate will also be updated and consolidated in terms of these orders. The updated rates of family pension will apply as and when family pension becomes payable in such cases.

(*ix*) The updated normal rate will become applicable from the date family ceases to be eligible for enhanced rate.

**(B) Revision of Enhanced Family Pension in the cases other than those mentioned at (*a*) above, *i.e.* where a Government Servent/Pensioner was in receipt of last pay not exceeding Rs. 1,500 p.m :—**

In such cases family pension at normal/enhanced rate will be admissible in terms of provisions contained in the aforesaid Government Resolution, Finance

Department, dated 15th November 1999 and accordingly Ready Reckoner appended thereto could be utilised for updating their normal/enhanced family pension. In such cases, the following provisions shall also be taken into account :—

(*a*) **Where a Government servant died while in service** and where the amount of enhanced family pension is less than 50% of the minimum of the revised scale of pay introduced with effect from 1st January 1996 for the post last held by the deceased Government servant at the time of his death, the enhanced family pension shall be further stepped upto 50% of the minimum of such revised scale of pay.

(*b*) **Where a retired Government servant i.e. pensioner died prior to 1st January 1996,** the revised enhanced family pension will be 50% of the minimum of the revised pay scale introduced with effect from 1st January 1996 for the post last held by the pensioner at the time of his retirement or notionally revised pension of the pensioner as on 1st January 1996, whichever is less. In such cases, the restriction on enhanced family pension will be worked out by revising the pension of the deceased pensioner notionally as on 1st January 1996 by taking into consideration the provisions of relevant Pension Rules and Government Resolution, Finance Department, dated 15th November 1999 mentioned above ; and on the basis of his pay and qualifying service. The revised enhanced family pension will be restricted to the notional revised pension as on 1st January 1996. **In no case the enhanced family pension will be allowed at twice the consolidated/revised normal rate of family pension.**

2. Arrears already paid on account of consolidation of family pension as an interim measure in accordance with the provisions contained in Government Resolution, Finance Department, No. PEN. 1099/303/SER-4, dated 15th November 1999 as also dearness relief admissible thereon shall be adjusted by pension disbursing authorities i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury officers, as the case may be, against arrears becoming due on the revision of enhanced family pension and dearness relief admissible on the basis of this order.

3. The above provisions shall also be made applicable in the cases where a Government Servant/Pensioner had retired prior to 1st January 1989 and in respect of whom family pension at enhanced rate was admissible on or after 1st January 1996.

4. A few examples regarding calculation of Consolidated/Revised Enhanced Family Pension are given in **Annexure.**

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VASANT W. CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.

**(For pre-1996 pensioners)**

ANNEXURE

*(As referred to in para 4 of Government Resolution, Finance Department, No. PEN. 1000/95/SER-4, dated 1st August 2000)*

**Example I :**

**Consolidation/Revision of Enhanced family pension with effect from 1st January 1996 (Where a Government Servant died while in service prior to 1st January 1996)**

| | |
|---|---|
| (*i*) Date of death ... ... ... | 31st May 1995 |
| (*ii*) Scale of pay ... ... ... | Rs. 2,000–60–2,300–75–3,200 |
| (*iii*) Pay last drawn ... ... ... | Rs. 3,050 |
| (*iv*) Qualifying Service ... ... ... | 31 years |
| (*v*) Revised Scale of pay *w.e.f.* 1st January 1996 ... | Rs. 6,500–200–10,500 |
| (*vi*) Family pension admissible at the normal rate in force (*i.e.* prior to 1st January 1996) ... | Rs. 600 |
| (*vii*) Family pension admissible at the enhanced rate in force (*i.e.* prior to 1st January 1996) ... | Rs. 1,200. |
| (*viii*) Consolidated family pension as per the Ready Reckoner appended to Government Resolution Finance Department, dated 15th November 1999.— | |
| (*a*) Normal Rate ... ... ... | Rs. 1,838 |
| (*b*) Enhanced Rate ... ... ... | Rs. 3,626 |
| (*ix*) (*a*) Family pension admissible— @ 30 % of pay at (*iii*) above. ... ... | Rs. 915 |
| (*b*) Enhanced family pension (50% of the pay last drawn) ... ... ... | Rs. 1,525 |
| (*x*) (*a*) Additional family pension (normal rate) admissible on 1st January 1996 ... | Rs. 915 – 600 = 315 |
| (*b*) Enhanced additional family pension ... | Rs. 1,525—1,200 = 325 |
| (*xi*) (*a*) Total family pension (normal rate) admissible on 1st January 1996 ... ... | Rs. 1,838 + 315 = 2,153* |
| (*b*) Enhanced enhanced family pension on on 1st January 1996 ... ... | Rs. 3,626 + 325 = 3,951* |

* It has to ensured that the normal rate of Total family pension is not less than 30 per cent of the minimum of the revised scale of pay introduced w.e.f. 1st January 1996 relevant to the post held by the employee at the time of his death and the total family pension at enhanced rate is not less than 50 percent of the minimum of the side scale.

**Example II :**

**Consolidation/Revision of Enhanced family pension with effect from 1st January 1996 (Where a retired Government Servant *i.e.* pensioner died prior to 1st January 1996)**

(*i*) Date of retirement ... ... ... 31st October 1994

(*ii*) Date of death ... ... ... 31st May 1995

(*iii*) Scale of pay ... ... ... Rs. 2,000–60–2,300–75–3,200

(*iv*) Pay last drawn ... ... ... Rs. 3,050

(*v*) Qualifying service ... ... ... 31 years

(*vi*) Pension authorised at the time of retirement ... Rs. 1,419.

(*vii*) Revised Scale of pay *w.e.f.* 1st January 1996 ... Rs. 6,500–200–10,500

(*viii*) Family pension admissible at the normal rate in force (*i.e.* prior to 1st January 1996) ... Rs. 600

(*ix*) Family pension admissible at the enhanced rate in force (*i.e.* prior to 1st January 1996) ... Rs. 1,200.

(*x*) Notionally consolidated pension as per the Ready Reckoner appended to Government Resolution, Finance Department, dated 15th November 1999 Rs. 4,280.

(The consolidated pension shall not be less than—

$$\text{Rs. } 6500 \times \frac{50}{100} \times \frac{31}{33} = 3{,}054)$$

(*xi*) Consolidated family pension as per the Ready Reckoner appended to Government Resolution, Finance Department, dated 15th November 1999.—

(*a*) Normal Rate ... ... ... Rs. 1,838

(*b*) Enhanced Rate ... ... ... Rs. 3,626

(*xii*) (*a*) Family pension admissible—
@ 30 % of pay at (*iii*) above ... ... Rs. 915

(*b*) Enhanced family pension (by limiting to 50% of the pay last drawn or pension authorised, whichever is less *i.e.* lesser amount of the following ... ... ... Rs. 1,419

(*i*) 50 % of Rs. 3,050 = 1,525.

(*ii*) Pension authorised = Rs. 1,419.)

| | | |
|---|---|---|
| (*xiii*) (*a*) Additional family pension (normal rate) admissible on 1st January 1996 | ... | Rs. 915 – 600 = 315 |
| (*b*) Enhanced additional family pension | ... | Rs. 1,419 – 1,200 = 219. |
| (*xiv*) (*a*) Total family pension (normal rate) admissible on 1st January 1996 ... | ... | Rs. 1,838 + 315 = 2,153* |
| (*b*) Total enhanced family pension on 1st January 1996 ... | ... | Rs. 3,626 + 219 = 3,845* |

* It has to be ensured that the normal rate of Total Family Pension is not less than 30 per cent of the minimum of the Revised Scale of pay introduced *w.e.f.* 1st January 1996 relevant to the post held at the time of retirement and the Total Family Pension at enhanced rate is not less than 50 per cent of the minimum of the said scale and subject to the condition that it shall not exceed the revised final pension as on 1st January 1996.